## **महाराष्ट्र शासन**

**ई-मेल/पत्र**

क्र : अधापु १००९/१४८३/प्र.क्र.३५५०/नापू २२
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २६ जून, २००९.

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई,
२) अप्पर जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
३) जिल्हा पुरवठा अधिकारी. (सर्व जिल्हे),
४) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर).

विषय :- **लक्ष निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत एपीएल योजनेतील माहे जुलै, २००९ चे अन्नधान्याचे नियतन.**

संदर्भ :- **केंद्र शासनाचे क्र.१-३/२००९-बी.पी.-III (१६), दि.०५.०६.२००९ चे पत्र.**

केंद्र शासनाने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ए.पी.एल. योजनेकरीता माहे जुलै, २००९ ते मार्च,२०१० या कालावधीकरिता ५१५४ मे.टन गव्हाचे व २९८७ मे.टन तांदूळाचे मासिक नियतन तसेच ८८,३४६ मे.टन गव्हाचे व १५,४४३ मे.टन तांदुळाचे अतिरीक्त नियतन मंजुर केले आहे.

केंद्र शासनाने मंजुर केलेल्या वर उल्लेखित ९३,५०० मे.टन गव्हाच्या व १८,४३० मे.टन तांदुळाच्या नियतनाच्या मर्यादेत राज्यातील नियतनाची मागणी करणा-या जिल्हयांना एपीएल योजनेंतर्गत माहे जुलै, २००९ साठी या पत्रान्वये नियतन मंजुर करण्यात येत आहे. जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. सदर नियतनाच्या मर्यादेत एपीएल योजनेंतर्गत गहू व तांदूळाची उचल व वाटप करण्यात यावे. तसेच, प्रत्येक महिन्याच्या नियतन मंजुरी आदेशासोबत देण्यात येणाऱ्या पुढील सूचनांचे पालन अद्यापही काही जिल्हयांकडून होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी, सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे :-

१) नियतनानुसार अन्नधान्य उचलण्यासाठी एकूण ५० दिवसांची मुदत राहील. प्रत्येक महिन्याच्या नियतनाच्या उचलीची मुदत आधीच्या महिन्याच्या १ तारखेपासून नियतनाच्या महिन्याच्या २० तारखेपर्यन्त राहील. **माञ माहे जुलै,२००९ च्या नियतनाची उचल करण्यासाठी केंद्र शासनाने त्यांच्या मंजुरी आदेशाच्या दिनांकापासून म्हणजे दि. ५ जुन,०९ पासून ५० दिवसांची मुदत दिली आहे. त्यामुळे माहे जुलै, २००९ च्या नियतनाची उचल दि. २४ जुलै, २००९ पर्यंत करण्यात यावी.**

२) अन्नधान्याचे नियतन उचलण्यासाठी नियतनाच्या महिन्याच्या **१५ तारखेपर्यंत** भारतीय अन्न महामंडळाकडे धान्याची रक्कम जमा करण्यात यावी. तथापि, **केंद्र शासनाने माहे जुलै, २००९ च्या नियतनाकरिता रक्कम जमा करण्याबाबत मुदतीचा उल्लेख केला नसल्याने, भारतीय अन्न महामंडळाच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे संपर्क साधून रक्कम जमा करण्याच्या मुदतीची खात्री**

**करावी** व अंतिम दिनांकाची वाट न पाहता विहित मुदतीत रक्कम जमा करुन, नियतनानुसार संपूर्ण धान्याची उचल होईल याची दक्षता घ्यावी.

३) एपीएल योजनेंतर्गतची गहू व तांदूळाची मागणी उशिरात उशिरा नियतनाच्या महिन्याच्या आधीच्या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत जिल्हयांनी, शासनाकडे नोंदविणे आवश्यक राहील. उशीराने नोंदविलेल्या मागणीची दखल घेतली जाणार नाही.

४) मागणी नोंदविताना गत सहा महिन्यात एपीएल योजनेंतर्गत अन्नधान्याच्या नियतन, उचल व वाटपाचा तपशिल समर्थनीय कारणांसह शासनास सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. प्राप्त झालेली मागणी व उपलब्धता या बाबी विचारात घेवून एपीएलचे नियतन मंजूर केले जाईल, याची नोंद घ्यावी.

**५) शासनाचे नियतन मंजूरीचे आदेश ई-मेलद्वारे व उपआयुक्त (पुरवठा) यांना फॅक्स व ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. तसेच हे आदेश अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वेबसाईटवर ठेवण्यात आलेले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब,विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.**

६) नियतन समर्पित करावयाचे प्रस्ताव किमान नियतनाच्या महिन्याच्या पहिल्या आठवडयात शासनाकडे सादर होणे आवश्यक आहे. समर्पणाच्या प्रस्तावात लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप करण्याकरीता जिल्हयातील शासकीय गोदामात पर्याप्त धान्यसाठा उपलब्ध आहे किंवा कसे याचा उल्लेख असणे गरजेचे आहे.

७) मुदतवाढीचे प्रस्ताव पाठविण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक ०३.११.२००७ व १३.०३.२००८ च्या परिपत्रक व पत्रातील निदेश स्वंयस्पष्ट असून, त्याप्रमाणे मुदतवाढीबाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या संदर्भात शासनाशी अनावश्यक पत्र व्यवहार टाळावा.

८) अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निदेशानुसार संयुक्तपणे नमुने घेऊन धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी.

९) सदर धान्य लक्ष निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यपध्दती प्रमाणे वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी. कार्डधारकास स्वस्तधान्य दुकानाच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप होत असल्याची खातरजमा करण्यात यावी.

१०) सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २००१ मधील तरतूदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" (Utilization Certificate) नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

मंजूर एपीएल नियतनाच्या वाटपाचा तपशिल प्रभागनिहाय / तालुकानिहाय शासनास व उप संचालक, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांना विहीत मुदतीत सादर करण्यात यावा. तसेच, सदर माहिती न चुकता "महाफूड" आज्ञावलीत दर आठवड्यास वेळीच भरावी व माहे ऑगस्ट, २००९ या महिन्याच्या नियतनाची मागणी उशिरात उशिरा दि. ५ जुलै, २००९ पर्यंत शासनास कळवावी.

( विनायक चव्हाण )
कार्यासन अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

सोबत :- वरीलप्रमाणे

**प्रत:- १) सर्व उप आयुक्त (पुरवठा) (फॅक्सद्वारे)**

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे हे आदेश सर्व जिल्ह्यांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. तसेच हे आदेश अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वेबसाईटवर टाकण्यात आलेले आहेत. ही बाब आपल्या विभागातील अधिनस्त जिल्ह्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व त्यांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवड्यास भरली जाण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

**२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.**

बीपीएल व अंत्योदय योजनेच्या नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" अज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

(विनायक चव्हाण)
कार्यासन अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत :-

१) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
२) कार्यासन अधिकारी (नापु-२८), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
यांना केंद्र शासनाच्या मूळ पत्राच्या प्रतीसह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) जनसंपर्क अधिकारी, (कार्यासन अधिकारी नापु-२६), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी प्रस्तुत नियतन प्रसिध्दी माध्यमामध्ये प्रसिध्द करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यासनाकडे पाठवावा.
४) अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.
५) निवडनस्ती (नापु-२२), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

(कृ.मा.प.)

## Allocation of Food grains under APL for the month of July, 2009.

( fig in M.Tonnes)

| Sr. No. | Districts / Areas | Last date for Lifting of foodgrains 24/07/2009. | | | | Total Wheat | Total Rice |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Regular Allocation | | Additonal /Adhoc allocation | | | |
| | | Wheat | Rice | Wheat | Rice | | |
| 1 | Mumbai(BRA-TRA) | 1,584 | 407 | 20,456 | 1,183 | **22,040** | **1,590** |
| 2 | Thane | 100 | 240 | 900 | 1,160 | **1,000** | **1,400** |
| 3 | Raigad | 100 | 240 | 1,900 | 1,160 | **2,000** | **1,400** |
| 4 | Ratnagiri | 100 | 240 | 1,900 | 1,160 | **2,000** | **1,400** |
| 5 | Sindhudurga | 50 | 110 | 350 | 1,290 | **400** | **1,400** |
| 6 | Nasik | 200 | 50 | 1,800 | 150 | **2,000** | **200** |
| 7 | Ahmednagar | 200 | 20 | 1,800 | 80 | **2,000** | **100** |
| 8 | Jalgaon | 100 | 20 | 600 | 280 | **700** | **300** |
| 9 | Dhule | 70 | 20 | 930 | 80 | **1,000** | **100** |
| 10 | Nandurbar | 50 | 80 | 950 | 420 | **1,000** | **500** |
| 11 | Pune | 250 | 80 | 2,750 | 420 | **3,000** | **500** |
| 12 | Satara | 110 | 50 | 1,890 | 200 | **2,000** | **250** |
| 13 | Sangli | 80 | 50 | 4,920 | 250 | **5,000** | **300** |
| 14 | Solapur | 200 | 50 | 3,960 | 250 | **4,160** | **300** |
| 15 | Kolhapur | 200 | 110 | 6,800 | 690 | **7,000** | **800** |
| 16 | Aurangabad | 110 | 10 | 3,890 | 40 | **4,000** | **50** |
| 17 | Jalana | 60 | 20 | 440 | 20 | **500** | **40** |
| 18 | Parbhani | 80 | 80 | 2,420 | 320 | **2,500** | **400** |
| 19 | Hingoli | 100 | 20 | 100 | 30 | **200** | **50** |
| 20 | Beed | 100 | 20 | 1,700 | 30 | **1,800** | **50** |
| 21 | Nanded | 150 | 80 | 1,850 | 420 | **2,000** | **500** |
| 22 | Latur | 110 | 20 | 1,890 | 80 | **2,000** | **100** |
| 23 | Osmanabad | 110 | 20 | 90 | 30 | **200** | **50** |
| 24 | Amravati | 100 | 80 | 1,700 | 270 | **1,800** | **350** |
| 25 | Akola | 70 | 50 | 1,930 | 250 | **2,000** | **300** |
| 26 | Washim | 50 | 80 | 1,550 | 320 | **1,600** | **400** |
| 27 | Yeotmal | 90 | 140 | 710 | 260 | **800** | **400** |
| 28 | Buldhana | 100 | 20 | 2,400 | 480 | **2,500** | **500** |
| 29 | Nagpur (DSO) | 170 | 100 | 4,330 | 900 | **4,500** | **1,000** |
| 30 | Nagpur (FDO) | 110 | 100 | 4,390 | 900 | **4,500** | **1,000** |
| 31 | Wardha | 50 | 20 | 1,750 | 80 | **1,800** | **100** |
| 32 | Bhandara | 50 | 80 | 950 | 420 | **1,000** | **500** |
| 33 | Gondia | 50 | 150 | 1,450 | 650 | **1,500** | **800** |
| 34 | Chandrapur | 50 | 50 | 2,450 | 250 | **2,500** | **300** |
| 35 | Gadchiroli | 50 | 80 | 450 | 920 | **500** | **1,000** |
| | **Total** | **5,154** | **2,987** | **88,346** | **15,443** | **93,500** | **18,430** |

( Vinayak Chavan )
**Desk Officer,**
**Food, Civil Supplies and C. P. Dept.**

G:\TPDS Allocation-09-10\APL-3550- APL-July 2009.lwp